## दिनांक १३.०५.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक १३.०५.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.अतिरिक्त आयुक्त (१), महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती
मा.स.स.न.र., महानगरपालिका, अमरावती
मा. कार्यकारी अभियंता, (म.रा.वि.वि.) अमरावती
श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती
श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

### दि.१३/०५/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

## झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री. राजेंद्र श्रीरामजी पाचघरे, कोणार्क कॉलनी, अमरावती | कडुलिंब | ०१ | दि.०७/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुलिंबाच्या खालच्या बाजुच्या २ ते ६ इंची आकाराच्या **फांद्या तोडण्यास परवानगी देण्यास हरकत नाही**, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| २. | श्री. माहेबराव गणेशराव बोंडे, गणेश निवास, गधानगर, भाऊ कॉलनी, अमरावती. | रामफळ -२ | ०२ | दि.०८/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता **रामफळांच्या झाडांच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी**, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्री. रमेश उकर्डाजी काळे, नर्मदा निवास, नंदनवन कॉलनी, अमरावती | कडुनिम -२ | ०२ | दि.०७/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुनिम वृक्षाच्या फांद्या घराच्या छतावर आलेल्या नवोदय विद्यालयाच्या परिसरातील वृक्षांच्या फांद्या **तोडण्यास परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ४. | श्री. प्रशांत माणिकराव अेडाखे, भाऊ कॉलनी, राधानगर, अम. | पाम ट्री | ०१ | दि.०७/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता भाऊ कॉलनी मध्ये पाम चे एक झाड सार्वजनिक रस्त्यावर आहे. झाडाच्या खोडाला किड लागल्यामुळे झाड केव्हाही पडू शकते. त्यामुळे **सदर पाम चे झाड काढण्याला परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ५. | अनुसयाबाई गुलाबराव अवसरमोर, सिध्दार्थ नगर, रामपुरी कॅम्प, अमरावती | आंबा | ०१ | दि.०७/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर आंब्याचे झाड सार्वजनिक रस्त्याच्या कडेला असुन हिरवे आहे. **अर्जदाराला झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ६. | श्री. गणेश गोपाळराव काळे, श्रीराम नगर, अमरावती | पाम | ०१ | दि.०७/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर पाम चे झाड अर्जदाराच्या आवाराचे बाहेर आहे. सदर बाब M.S.E.B ला अवगत करावी असे मत आहे, **तुर्त परवानगी देण्यात येवू नये,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ७. | श्री. मनोहर थदाराम धामेचा, कृष्णानगर, गल्ली नं.१, अमरावती | आडजात | ०१ | दि.०८/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर झाड Rain Tree चे रस्त्याचे कडेला असुन हिरवेगार आहे. **सदर झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ८ | श्री. दिपक नामदेवराव लोखंडे, म्हाटगांव जुनी वस्ती, अमरावती | गुलमोहर-१, कडुनिम -५ | ०६ | दि.०८/०५/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने पेट्रोल पंपावर मुख्य रस्त्यापासुन जाणे-येणे करण्याकरीता रस्त्याचे कडेला असलेले ३ ते ४ वर्ष वयाचे ५ कडूनिम व १ गुलमोहर तोडण्याची परवानगी मागितलेली आहे. सदर झाड हिरवेगार असुन पेट्रोल पंपासुन लांब आहे. मुख्य रस्त्याचे कडेला NHAI Plantation केलेले आहे. सदर झाडे | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| | प्राचार्य, कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रम, रूरल इन्स्टिटयुट, अमरावती | विविध प्रजाती | १२० | दि.०४/०४/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराला विहीत नमुन्यात माहिती सादर करणेकरीता सुचविले असता अर्जदाराने कार्यालयात वृक्षाची माहिती सादर केली आहे. मा.तांत्रिक सदस्य यांचे मौखिक आदेशानुसार सदर स्थळाची पुनरपाहणी केली असता अर्जदाराच्या अहवालानुसार ३६ सागवान वृक्ष परिपक्व झालेली व ०२ सागवान, ०४ अशोका, १ गोरखचिंच असे एकुण ०७ वृक्ष पुर्णपणे वाळलेले वृक्षांची परवानगी मागितलेली आहे. सबब निर्णयार्थ सादर. | परवानगी देण्यात हरकत नाही. | नियमानुसार सागवान वृक्षास १:१ प्रमाणे व इतर वृक्षाकरीता १:३ प्रमाणे अनामत रक्कम स्विकारून वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| १० | श्री.गणेश दादाराव अनासाने, दहीसाथ चौक, भाजीबाजार, अमरावती यांची दि.११/१२/२०२४ रोजीची ऑनलाईन तक्रार | विविध प्रजाती | १०/१२ | विजय कॉलनी मधील म.न.पा बगीचा येथील जे.सी.बी. द्वारे विना परवानगी वृक्षतोड केल्याबाबतची श्री.गणेश दादाराव अनासाने यांचे तक्रारीनुसार दि.१३/१२/२०२४ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पंचनामा तयार करण्यात आला. सदर म.न.पा बगीच्या मध्ये सा.बां.विभाग अमरावती यांचे सभागृह बांधकामाचे काम सुरू होते. सदर काम शिव बिल्डर्स कंपनी अमरावती व दुसरे नालीचे बांधकाम उत्तर झोन १ म.न.पा. कार्यालय यांच्या मार्फत कंत्राटदार श्री. शैलेश साहू यांचे असल्याने पाहणी दरम्यान कळले. सदर तक्रारदार यांच्या तक्रारीचे अनुषंगाने कार्यालयामार्फत संबंधीत यंत्रणा जसे सा.बां. विभाग अमरावती व नाली बांधकाम बाबत उप अभियंता (बांधकाम) उत्तर झोन १ कार्यालय यांना विना परवानगी वृक्षतोड केल्याबाबत नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्या नोटीसच्या अनुषंगाने सा.बां. विभाग अमरावती यांचा अहवाल कार्यालयाला प्राप्त झाला असुन सोबत संलग्न आहे. त्यामधे सदर वृक्ष तोडले नसल्याबाबत पत्रात कडविले आहे.तसर बाधकामात कोणतेही वृक्ष येत नसल्यामुळे झाडे तोडण्यात आली नाही असे कडविले आहे. तसेच उप अभियंता (बांधकाम) उत्तर झोन १ यांचा अहवाल नुसार (त्यांनी दोन वृक्ष तोडल्याचे नमुद असुन १ वृक्ष वाळलेला असल्याचे पत्रात नमुद दिले आहे.) उर्वरीत वृक्षाबाबत F.I.R. दाखल करण्याकरीता कागदपत्र व फोटो संलग्न करुन ते गाडगेनगर पोलीस स्टेशनला प्रकरण सादर करण्यात आले आहे. **याबाबत निर्णय घेण्याकरीता अवलोकनार्थ सादर.** | दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. | नियमानुसार कंत्राटदार यांच्या देयकातून २०,०००/- रु.प्रति वृक्ष यांप्रमाणे १,००,०००/- दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी. |

<table>
<tr>
<td>भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण ग्रिनलँड बिझनेस पार्क,बोरगांव धर्माळे,अमरावती</td>
<td>विविध प्रजाती</td>
<td>११९ वृक्ष</td>
<td>उपरोक्त विषयानुसार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण यांचा दि.११/०७/२०२४ रोजीचा रजिस्टर पोस्टाने कार्यालयास प्राप्त अर्जानुसार मा.तांत्रिक सदस्य यांनी कागद पुर्तता बाबत दि.१८/०९/२०२४ रोजी जा.क्र.अमनपा/उ.प्र/स.आ/१५८७/२५, दि.१८/०९/२०२४ रोजी पत्र तयार करण्यात आले असुन त्यांनी दि.०३/०१/२०२५ रोजी सदर पत्राची पोच पावती देण्यात आली. तदनंतर पुनःश्च या कार्यालयाला दि.९/०१/२०२५ रोजीचा वृक्ष तोडण्याबाबत अर्ज कार्यालयाला प्राप्त झाला असुन त्या अनुषंगाने मा.तांत्रीक सदस्य दि.१७/०१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराला खालील बाबची पुर्तता करण्याबाबत सुचविले आहे.
<table>
<tr><td>अ.क्र.</td><td>वृक्षाचे नाव</td><td>वृक्ष क्रमांक</td><td>वृक्षाची उंची</td><td>वृक्षाची जाडी</td><td>वृक्षा वय</td></tr>
</table>
जसे की १) प्रपत्र माहीती देणे बाबत. २) सर्व वृक्षांचे क्रमांकाचा फोटो अ) काढावयाचे वृक्ष लाल रंगाने ब) राखावयाचे वृक्ष हिरव्या रंगाने. ३) पर्यायी वृक्ष लागवड कुठे केल्या जाणार आहे. त्याची स्थळ दर्शक नकाशा. ४) राष्ट्रीय महामार्गाने महामार्गाचे बांधकामात येणारी वृक्ष, तोडावयाची नाही तर सर्व वृक्ष ट्रान्सप्लांट करण्याबाबत निर्णय घेतला आहे. त्याबाबत आपले मत व स्पष्टीकरण करणे, याबाबत कार्यालयामार्फत जा.क्र.अमनपा/उ.प्र /स.आ/९५०, दि.२०/०१/२०२५ रोजी पत्र देण्यात आले असुन अहवाल अप्राप्त आहे. दि.०५/०२/२०२५ रोजी वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त, उत्तर झोन (१) व मा.तांत्रिक सदस्य यांनी संयुक्त पाहणी केली असता स्मरणपत्र देण्याबाबत सुचीत करण्यात आले. तसेच आज दि.२४/०२/२०२५ रोजी तिस-यांदा स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने नंबरींग केले असल्याचे दिसुन आले. तसेच बांधकामात येणारी ११९ विविध प्रजातीची वृक्ष काढावयाची असे अर्जात म्हटले होते. तथापि सुक्ष्म नियोजन करण्यासाठी सुचविण्यात आले. त्यात विविध प्रजातीची (लिस्ट संलग्न) २१ वृक्ष वाचविण्यात येतील असे दिसुन आले. उर्वरीत ९८ वृक्ष काढावयाची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. व वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.१२/०३/२०२५ अन्वये ठराव क्र.१२ नुसार मंजुर करण्यात आले होते. त्यानुसार जा.क्र.अमनपा/उ.प्र/स.आ/०२/२०२५, दि.०१/०४/२०२५ रोजी अनामत रक्कम रू.५,४०,०००/- लक्ष रू. वृक्ष प्राधिकरण फंडात जमा</td>
<td>सदर बाबत</td>
<td>विनापरवानगी ३० वृक्षांची तोड केली या प्रकरणी अवैध वृक्ष प्रकरणी २०,०००/- प्रति वृक्ष प्रमाणे ६,००,०००/- रुपये दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच इतर परवानगी दिलेल्या ६८ वृक्षांची नियमानुसार ४,०८,०००/- रु. अनामत रक्कम भरणा करण्याबाबत पत्र देण्यात यावे.</td>
</tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करणेबाबत सुचविले असुन अर्जदाराने दि.०२/०४/२०२५ रोजी पत्र प्राप्त केले असुन अजुनपावेतो वृक्ष प्राधिकरण फंडात भरणा जमा करण्यात आला नाही.<br>त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे दि. ०९/०४/२०२५ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने दि.१०/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळाची पंचनामा करणेकरीता उद्यान निरीक्षक, उद्यान सुपरवायजर, स्वास्थ निरीक्षक यांचे समक्ष तयार करण्यात आला असुन पंचनामा संलग्न आहे व ११/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता असे आढळले की, श्रीमती प्राजक्ता डी. सातपुते, प्रकल्प संचालक नॅशनल हायवे ऑफ ऑथोरीटी ऑफ इंडीया, यांनी दि.०१/०४/२०२५ च्या मागणी पत्रानुसार नमुद रक्कमेचा भरणा न करता ३० वृक्षांची तोड केली व त्यातील ४ वृक्षांची जाळून हवा प्रदुषण केले. त्याबाबत नांदगांव पेठ पोलिस स्टेशन येथे F.I.R. दाखल करण्याबाबत पत्र देण्यात आले. F.I.R. पत्राची प्रत संलग्न आहे. याबाबत निर्णय घेण्याकरीता अवलोकनार्थ सादर. | | |

## झोन क्र.२

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. आशिष मधुकर देशमुख प्रभात कॉलनी अम | सप्तपर्णी वृक्ष फांदया | २ | दिनांक २१/०४/२०२५ रोजी वृक्ष अधिकारी यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. दोन सप्तपर्णी वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या फांदया अर्जदाराच्या घरावर दक्षिण दिशेकडील झुकलेल्या असल्याचे दिसुन येत आहे. तसेच उत्तर दिशेकडीलविद्युत तारेवर येत असणा-या फांदया २-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उद्यान विभाग मनपा यांनी विद्युतविभागाचे सहकार्य घेवुन फांदया काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. असे सुचित करण्यात यावे. उद्यान विभाग यांना वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तरमंजुरीस सादर.जा.क्र.६२ दि. २३/०४/२०२५ | कार्योत्तर मंजुरी देण्यास हरकत नसावी. | सदर प्रकरणी वृक्ष काढण्यास व वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. |
| २ | श्री. भिमराव | पिंपळ | १ | दिनांक ०२/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | देवराव मनोहरे अशोक नगर | उंबर रामफळ | १<br>१ | यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराला घरकुल बांधकाम मंजुर असल्याचे सांगण्यात आले. तथापी मंजुरीचे पत्र सोबत जोडलेले दिसुन येत नाही. मंजुरी पत्र सोबत जोडण्यात यावे. त्यानंतर नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही. | नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ३. | श्री. मिलिंद रघुनाथ जोशी जोशी कॉलनी अम | इंग्रजी चिंच<br>उंबर<br>साग<br>कडुनिंब<br>आपटा<br>सुबाभुळ<br>शेवगा<br>बहावा<br>शंकेश्वर<br>गुलमोहर<br>चिंच<br>अशोका | १<br>५<br>३<br>७<br>३<br>३<br>३<br>३<br>१<br>१<br>१<br>२ | दिनांक ०२/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे प्रतिनिधी श्री गौरव पनपालीया हजर होते. अर्जदाराचा एकुण २३००० स्के. फुट असल्याचे सांगण्यात आले अर्जदाराला त्या प्लॉटचे तुकडे पाडुन विकायचे आहे. असे समजले अर्जदारश्री मिलींद जोशी यांनी त्या खुल्या प्लॉट मध्ये असलेली जुनी सिमेट कॉक्रीटची इमारत पाडण्यासाठी तसेच प्लॉटचे सबडिव्हिजन करण्यासाठी मनपाकडे अर्ज केल्याचे सांगण्यात आले. अर्जदारास तुर्त कोणतेही बांधकाम करावयाचे नाही. सबब सदर खुल्या प्लॉटमध्ये असलेली एकुण यादी नुसार ५० वृक्ष हिरवीगार असुन छान वाढलेली आहेत. वृक्ष तोडण्याचे कोणतेही कारण नाही. करीता प्लॉटचे सब डिव्हिजन तुकडे मंजुरी होई पर्यंत वृक्ष काढण्याची गरज दिसुन येत नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. व वृक्षाला इजा पोहचवु नये संपुर्ण वृक्षाला संरक्षण दयावे. असे सुचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.वृक्षाला कुठल्याही प्रकारे इजा पोहचू नये असे सूचित करावे.खुलासा फेटाळण्यात येत असून दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. |
| ४. | श्री. नितेश विनोद खंडेलवाल खापर्डे वाडा रामकमल चौक अमरावती | कडुनिंब फांदया | २ | दि. ०२/०४/२०२५ रोजी स्वास्थ निरीक्षक यांनी स्थळ निरीक्षण केले असता प्राप्त अहवाल प्रभाग क्रं. १३ अंबापेठ मधिल राजकमल चौक खापर्डे वाडा येथिल परीसरामधिल दोन कडुनिंब झाडाच्या फांदया तोडलेल्या आढळुण आले असे निर्दशनास आले आहे. त्यानुसार गैरअर्जदार यांना नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५चे सेक्शन ५ कलम ८(१) व सेक्शन ८ कलम २१(१)(२) नुसार ७ दिवसात खुलासा सादर करणे बाबत नोटिस देण्यात आलेली आहे. जा.क्र ११ दि. ०२/०४/२०२५ या नुसार<br>दि. ११/०४/२०२५ रोजी खुलासा सादर कण्यात आलेला आहे. आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितोकी मी किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यांनी सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारची झाडांची तोड अथवा फांदया कापण्याचे कृत्य केलेले | पुन्हा एकदा पाहणी करण्यात यावी. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत पाहणी करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नाही. आपण पाठविलेल्या नोटिस मधिल आरोप हे निराधार व वस्तु स्थिती विरुध्द आहेत. नोटिसमधील नमुद केलेल्या झाडांच्या किंवा फांदयांच्या तोडीबाबत कोणतीही पुर्वपरवानगी न घेता कृत्य केल्याचा आरोप आमच्यावर केलेला आहे. परंतु अश्या प्रकारचा कोणताही प्रत्यक्ष कृती आम्ही केलेली नाही. तरी कृपया या प्रकरणाची योग्य तपासणी करुन वास्तवीक परीस्थिती परताळणी करण्यात यावी. तसेच आपल्याकडे सदर आरोपास समर्थनार्थ कोणतेही ठोस पुरावे असल्यास कृपया उपलब्ध करुन दयावे जेणे करुन या गैरसमजुतीचे निराकरण कराता येईल. या अनुषंगाने मी विनंती करतोकी,संबंधित परीसरात योग्य व निष्पक्ष स्वरुपची तपासणी करण्यात यावी. जेणेकरुन या बाबत निर्माण झालेला गैरसमज दुर करता येईल. सदर परीसरात दोन झाडे वाकलेली स्थितीत आहे. सध्या ग्रीष्म ऋतु सुरु असुन आगामी पावसाळयाच्या पार्श्वभुमीवर जोरदार वारे होण्याची शक्यता असते अश्या परिस्थितीत ही झाडे नैसर्गिकरित्या कोसळल्यास त्यामुळे होणा-या कोणत्याही प्रकारच्या नुकसानास मी किंवा माझे कुटुंबीय जवाबदार राहणार नाही. तरी या झाडांची सदया असलेली स्थिती लक्षात घेता योग्य ती कार्यवाही करुन संबंधित झाडे तोडण्यात यावी. मी यासंबंधी लागणारे शुल्क भरण्यास तयार आहे. आपल्या कडुन या प्रकरणी योग्य निर्णय घेण्यात यावा. हि विनंती या नुसार विहीत नमुन्यात अर्ज सादर करण्याबाबत कळविले आहे. जा.क्र १००दि.०७/ ०५/२०२५ उचित निर्णयास सादर | | |

# झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | निलेश जामनेरकर रा.संजय गांधी नगर ना.२ | आंबा | १ | दि.०७/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले.अर्जदाराच्या घराच्या आवारात आंबा वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.वृक्षाच्या विद्युत वाहिनीकडे झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-३ व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| २ | श्री जयेश प्रकाश परीवाले रा.फ्रेजरपुरा. | कडूनिंब | ४ | १)दि.०७/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले.अर्जदाराचे घराचे बांधकाम सुरु आहे.बांधकाम परवानगी अर्जासोबत दिसून येत नाही.परवानगी सादर केल्यानंतर परवानगी बाबत विचार करता येईल.तूर्त परवानगी नाकारण्यात यावी.२)अर्जदाराच्या राहत्या घराचे समोर असलेल्या वृक्षाच्या २ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही म.न.पा.च्या उद्यान विभागा मार्फत काढण्याची कार्यवाही करावी. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ३ | श्रीमती भाग्यश्री उदय खोत रा.राजहिल कॉलोनी अम. | आंबा<br>कडूनिंब | १<br>२ | दि.०७/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले.अर्जदार बाहेरगावी असल्याने त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा होऊ शकली नाही. अर्जदाराच्या खाली प्लॉट मध्ये कडूनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.कोणतीही अडचण दिसून येत नाही.विद्युत विभागाने पूर्वीच तारेकडे झुकलेल्या फांद्या तोडल्याचे दिसून आले.फांद्या काढण्याच्या कार्यास कार्योत्तर मान्यता देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. |
| ४ | श्रीमती सिंधुताई गवई रा.गगलानी नगर अम. | गुलमोहर | २ | वृक्ष प्राधिकरणाचे निर्देशानुसार फेर तपासणी करण्यात आली.अर्जदाराने अर्जात वर्णन केल्याप्रमाणे त्याची आर्थिक परिस्थिती वाईट नसल्याचे दिसून आले.अर्जदार घरावर मजल्याचे बांधकाम करीत आहे.आर्थिक परिस्थिती सुदृढ आहे.नियमानुसार पर्यायी वृक्ष लागवड करण्याची ठेव स्वीकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | नियमानुसार पर्यायी वृक्ष लागवड करण्याची ठेव स्वीकारून वृक्ष काढण्याची देण्यास हरकत नाही | नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.खुलासा फेटाळण्यात येत आहे. |
| ५ | डॉ.सरोज पिल्लेवान रा.अंबिका नगर,अम. | वाळलेला वृक्ष | १ | आरोग्य वर्धिनी केंद्र परिसरात असलेले एक वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी दि.१६/०४/२५ रोजी देण्यात आली आहे.कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी. | वृक्ष वाळलेला दिसून आले आहे. | वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आह. |
| ६ | गैरअर्जदार अनिल | विनापरवान | २ | सदर प्रकरणात खुल्या प्लॉट वर बांधकाम करतांना गैरअर्जदार श्री.अनिल केवलरामानी यांनी विनापरवानगी | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गुरुमुखदास केवलरामानी रा.जलाराम नगर अम. | गी वृक्ष तोडले | | २वृक्ष तोडले होते. त्याकरिता त्यांना दि.१३/०२/२३ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यावर त्यांनी दि.२१/०२/२३ रोजी दिलेला खुलासा वृक्ष प्राधिकरण सभा दि.२८/०३/२३ च्या सभेतील ठराव क्र.२३ नुसार अमान्य करण्यात येऊन रुपये ४०,००० दंड केला होता. परंतु गैरअर्जदार यांना वारंवार दंडाचे पत्र देऊन सुद्धा त्यांनी दंड भरला नाही.दि.०३/०२/२५ रोजी त्यांना पुन्हा स्मरण पत्र दिले होते परंतु अद्याप पर्यंत दंड भरला नाही. त्यांना केलेला दंड रुपये ४०,००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | दंड रक्कम ४०,०००/- रु. मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ७ | गैरअर्जदार श्रीमती जया थोरात रा.संत गुणवंत बाबा कॉलोनी संताजी नगर अम. | विनापरवानगी वृक्ष तोडले | १ | सदर प्रकरणात गैरअर्जदार श्रीमती जया थोरात यांनी त्यांच्या घरासमोरील १ वृक्ष विनापरवानगी तोडले होते. त्याकरिता त्यांना दि.१५ /०७ /२४ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यावर त्यांनी दि.२६/०७/२४ रोजी दिलेला खुलासा वृक्ष प्राधिकरण सभा दि.१४/०८/२४ च्या सभेतील ठराव क्र.२२ नुसार अमान्य करण्यात येऊन रुपये २०,००० दंड केला होता. परंतु गैरअर्जदार यांना वारंवार दंडाचे पत्र देऊन सुद्धा त्यांनी दंड भरला नाही.दि.०३/०२/२५ रोजी त्यांना दंड भरण्याबाबत पुन्हा स्मरण पत्र दिले होते परंतु अद्याप पर्यंत त्यांनी दंड भरला नाही. करिता त्यांना केलेला दंड रुपये २०,००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | दंड रक्कम २०,०००/- रु. मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ८ | गैरअर्जदार श्री.संजय तिडके रा.रुख्मिणी नगर अम. | विनापरवानगी वृक्ष तोड | ३ | सदर प्रकरणात गैरअर्जदार श्री. संजय तिडके यांनी स्वताच्या सुंदरलाल चौक स्थित खुल्या प्लॉट वरील ३ वृक्ष विनापरवानगी तोडले होते. व त्याची तक्रार श्री मिर्झा अफजल बेग रा. सुंदरलाल चौक यांनी केली होती.त्याकरिता त्यांना दि.०५/१२/२२ रोजी नोटीस देण्यात आली होती.त्यावर त्यांनी दि. ०९/१२/२२ रोजी दिलेला खुलासा वृक्ष प्राधिकरण सभा दि. २८/०३/२३ रोजीच्या सभेतील ठराव क्र. २१ नुसार अमान्य करण्यात येऊन गैरअर्जदार श्री संजय तिडके यांना ६०,००० रुपये दंड करण्यात आला होता.त्यावर त्यांनी दंड माफ करण्याबाबत पुन्हा पत्र दिले.त्यावर वृक्ष प्राधिकरण सभा दि.२७/०९/२३ च्या सभेतील ठराव क्र.०५ ( वेळेवरील विषय ) नुसार दंड माफ करण्यात येऊन ९ वृक्ष लावण्यात यावे व त्याची १८००० रुपये अनामत रक्कम भरण्यात यावी असा निर्णय देण्यात आला.त्यानुसार त्यांना दि.०४/१२/२३ रोजी अनामत रक्कम १८००० हजार रुपये भरण्याबाबत पत्र दिले परंतु त्यांनी अनामत रक्कम भरली नाही.परत त्यांना दि.०३/०२/२५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले होते. त्यालाही त्यांनी प्रतिसाद दिला नाही करिता त्यांची अनामत रक्कम रुपये १८००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | दंड रक्कम १८,०००/- रु. मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ९ | गैरअर्जदार | विनाप | ३ | सदर प्रकरणात गैरअर्जदार श्री. सुधीर शेंबेकर यांनी | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्री.सुधीर शेंबेकर रा.श्री कॉलोनी अम. | रवानगी वृक्ष तोड | | त्यांच्या घरासमोरील ३ वृक्ष विनापरवानगी तोडले होते.त्याकरिता त्यांना दि.११/११/२१ रोजी नोटीस देण्यात आली होती.त्याचा त्यांनी खुलासा सादर केला नाही.करिता सदर प्रकरण दि.१२/०४/२२ च्या वृक्ष प्राधिकरण सभेत ठेवण्यात आले होते त्यातील ठराव क्र. २७ नुसार गैर अर्जदार यांना १५००० हजार दंड व ७५००० हजार अनामत रक्कम रुपये भरण्याचे आदेशित केले होते. दंडाच्या नोटीस वर त्यांनी दि. २९/०६/२२,०३/०२/२३,२६/०९/२३ रोजी दंड व अनामत रक्कम माफ करण्या बाबत पत्र दिले होते.त्यावर वृक्ष प्राधिकरण सभा दि.२७/०९/२३ च्या सभेतील ठराव क्र.०९ नुसार दंड माफ करण्यात येऊन ९ वृक्ष लावण्यात यावे व त्याची १८००० रुपये अनामत रक्कम भरण्यात यावी असा निर्णय देण्यात आला.त्यानुसार त्यांना दि.०४/१२/२३ रोजी अनामत रक्कम १८००० हजार रुपये भरण्याबाबत पत्र दिले परंतु त्यांनी अनामत रक्कम भरली नाही.परत त्यांना दि.०३/०२/२५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले होते. त्यालाही त्यांनी प्रतिसाद दिला नाही करिता त्यांची अनामत रक्कम रुपये १८००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | दंड रक्कम १८,०००/- रु. मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १० | गैरअर्जदार श्रीमती रोहिणी देशमुख रा.श्री.कॉलोनी अम. | विनापरवानगी वृक्ष तोड | १ | सदर प्रकरणात गैरअर्जदार श्रीमती रोहिणी देशमुख यांनी त्यांच्या घरासमोरील १ वृक्ष विनापरवानगी तोडले होते.त्याकरिता त्यांना दि.११/११/२१ रोजी नोटीस देण्यात आली होती.त्याचा त्यांनी खुलासा सादर केला नाही.करिता सदर प्रकरण दि.१२/०४/२२ च्या वृक्ष प्राधिकरण सभेत ठेवण्यात आले होते त्यातील ठराव क्र. २८ नुसार गैर अर्जदार यांना ५००० हजार दंड व २५००० हजार अनामत रक्कम रुपये भरण्याचे आदेशित केले होते. दंडाच्या नोटीस वर त्यांनी दि. २९/०६/२२,०३/०२/२३,२६/०९/२३ रोजी दंड व अनामत रक्कम माफ करण्या बाबत पत्र दिले होते.त्यावर वृक्ष प्राधिकरण सभा दि.२७/०९/२३ च्या सभेतील ठराव क्र.१० नुसार(वेळेवरील विषय) दंड माफ करण्यात येऊन ३ वृक्ष लावण्यात यावे व ६००० रुपये अनामत रक्कम भरण्यात यावी असा निर्णय देण्यात आला.त्यानुसार त्यांना दि.०४/१२/२३ रोजी अनामत रक्कम ६००० हजार रुपये भरण्याबाबत पत्र दिले होते परंतु त्यांनी अनामत रक्कम भरली नाही.परत त्यांना दि.०३/०२/२५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले त्यालाही त्यांनी प्रतिसाद दिला नाही करिता त्यांची अनामत रक्कम रुपये ६००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी.उचित निर्णयास्तव सादर. | दंड रक्कम मालमत्ता करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | दंड रक्कम ६,०००/- रु. मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ११ | गैरअर्जदार श्री.पुरुषोत्तम मोहोड | विनापरवानगी वृक्ष | १ | सदर प्रकरणात गैरअर्जदार श्री.पुरुषोत्तम मोहोड यांनी त्यांच्या घरातील १ वृक्ष विनापरवानगी तोडले होते. त्याकरिता त्यांना दि.२७/०६ /२४ रोजी नोटीस देण्यात | दंड रक्कम मालमत्ता | दंड रक्कम ६,०००/- रु. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रा.दीपनगर अम. | तोड | | आली होती. त्यावर त्यांनी दि.०१/०७/२४ रोजी दिलेला खुलासा वृक्ष प्राधिकरण सभा दि.१४/०८/२४ च्या सभेतील ठराव क्र.०३ नुसार अमान्य करण्यात येऊन रुपये २०,००० दंड केला होता.दंड भरण्याबाबत त्यांना दि.१३/०९/२४ रोजी पत्र देण्यात आले होते. परंतु गैरअर्जदार यांनी दंडाची रक्कम भरली नाही.दि.०३/०२/२५ रोजी त्यांना दंड भरण्याबाबत पुन्हा स्मरण पत्र दिले होते परंतु अद्याप पर्यंत दंड भरला नाही. करिता त्यांना केलेला दंड रुपये २०,००० ते राहत असलेल्या मालमत्ता करात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | करात समाविष्ट करण्यास हरकत नाही. | मालमत्ता करात समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. |

## झोन क्र.४

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती मीना मधुकर मेश्राम शिवाजी नगर,नवी वस्ती बडनेरा | कडूनिंब १<br>गोधन १ | २ | • दि. ०४.०४ .२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>• **तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :- अर्जदाराला पेट्रोल पंप मंजूर असून त्याकरिता लागणारी परवानगी व म.न.पा.बांधकाम परवानगी,कंपनी चे पत्र इत्यादी बाबी सोबत जोडलेल्या दिसून आल्या २ वृक्ष ज्यात कडूनिंब वृक्ष व गोंधन वृक्ष पेट्रोल पंप च्या आतील रस्त्याच्या मध्ये येत असल्याने तसेच कडूनिंब वृक्ष देखील प्रत्यक्ष बांधकामात येत असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.नियमानुसार पर्यायी वृक्ष लागवडीकरिता ठेव स्वीकारून (२ x ३ =६ x २०००=१२,०००/-रु ) परवानगी देण्यास हरकत नाही.इतर वृक्षाला इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे.<br>• दिनांक ०८.०४.२०२५ रोजीच्या सभेतील दिलेल्या निर्देशानुसार पुन्हा स्थळ निरीक्षण करण्यात आले. १ गोन्धन पेट्रोल पंपाच्या आतील येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यामध्ये येत आहे. व कडूनिंब वृक्षाची मोठी फांदी पेट्रोल पंप कडे झुकलेली (पूर्वेस) ६० से.मी. पेक्षा असलेली काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. कडूनिंब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. नियमानुसार १ गोन्धन वृक्ष काढण्याची परवानगी करिता १x३=३x२०००= ६०००/- रुपये ठेव स्वीकारून परवानगी देण्यास हरकत नाही.<br>• **अहवालानूसार १ वृक्ष तोडण्याची व कडूनिंब वृक्षाची फांदी काढण्याची परवानगी मंजुरी करिता सादर.** | **बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | श्री नंदुभाऊ गोविंदराव काळे, राहणार - संभाजी नगर, नवी वस्ती बडनेरा | पिंपळ | १ | • दि. ०८.०५.२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>• **तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** सार्वजनिक रेणुका माता मंदिराजवळ पिंपळाचा वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे वृक्ष भरपूर वाढला असल्याने झाडाखाली असलेल्या घराकडे झुकलेल्या 2 फांद्या दक्षिणे कडील ६० से.मी. पेक्षा जास्त व पश्चिमेकडील १०० से.मी. ची 1 फांदी काढण्याची परवानगी अर्जदारास देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.<br>• अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढणाच्या मंजुरीकरिता सादर | फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ३ | तक्रारकर्ता श्री सुभाष शंकरराव ठाकरे राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर , बडनेरा, अमरावती | विविध प्रजाती चे | ३ | • सदर प्रकरणामध्ये प्राप्त तक्रारीनुसार सार्वजनिक रस्त्यावर असलेले 3 मोठे वृक्ष अवैधरित्या कटाई केल्याबाबत गैरअर्जदार 1. श्री निलेश शामराव नेरकर राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर अमरावती व गैरअर्जदार 2. श्री रामेश्वर बंड, राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर अमरावती यांना या कार्यालयाचे जा.अमनपा/दप्र/सआ/२१९३/२५ दिनांक ०७/०५/२०२५ अन्वये खुलासाचे पत्र देण्यात आलेले आहे. अद्याप पर्यंत गैर अर्जदार यांचे खुलासा अप्राप्त आहे. सदर अहवाल आपल्या माहितीस सविनय सादर | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |

## झोन क्र.५

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री दीपक रमेशराव लांजेवार रा. गणूवाडी, महाजनपुरा अमरावती | १ कडू निंब वृक्ष २चिच वृक्ष ३बाभूळ वृक्ष | ०३ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |
| २ | श्री पंकज धनश्याम वडूरकर रा. म्हाडा कॉलनी अमरावती | १कडू निंब वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | यावे. |
| | सौ. शोभा कोचर, सौ. सुनीता मानेकर रा दहीसात अमरावती | १अशोक वृक्ष<br>३आमटे वृक्ष | ०४ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |
| | सौ पुष्पा विनोद शिरभाते रा छाया कॉलनी, आकोली रोड अमरावती | १कडू बदाम वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |
| | श्री यासिरखान नासीर खान रा.तालाबपुरा, अमरावती | १कडू निंब वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |
| ६ | मनपा उर्दू शाळा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा जमील कॉलनी अमरावती | १ कडूनिंब वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ पाहणी न झाल्यामुळे सदर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल . | स्थळ निरीक्षण करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत स्थळ निरीक्षण करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. |

अतिरिक्त आयुक्त
महानगरपालिका, अमरावती